**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol. 12 No.2** **Nov-Dec 2024**

# महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

**अशोक किसन वाकडे**
राज्यशास्त्र विभाग, सामाजिक शास्त्र संकुल,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
**Corresponding Author: अशोक किसन वाकडे**
**Email:** ashokwakade23@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.14408548**

**सारांश:**

अशा जरी दोन्ही गटात ही निवडणूक विभागली जरी असली तरीही उमेदवारांना पाडण्यात अथवा निवडून आणण्यात छोटे पक्ष आणि अपक्ष यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. गेल्या तीन -चार वर्षा पासून महाराष्ट्रातल्या महानगरपालिकेच्या तसेच जिल्हा परिषदेच्या निवडणुका न झाल्याने अनेक उत्सुक उमेदवार सुद्धा यामध्ये आपली व्होट बँक टिकवण्याच्या हेतूने, आपले उपद्रव्य मूल्य क्षमता कायम ठेवण्यासाठी अपक्ष म्हणून लढत आहेत .या निवडणुकीतून कदाचित कोणत्याच आघाडीला बहुमत न मिळाल्यास अपक्षांचा बोलबाला वाढणार आहे मुख्यतः निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर अवघे ७२ तासच सरकार स्थापनेसाठी आहेत. त्यामुळे निवडणुकीचे कल जाहीर होण्याच्या अगोदरच अपक्षांचे कल कळायला लागणार आहे. अपक्षांची कुठल्याच राजकीय विचारसरणी, सिद्धांत याच्याशी बांधीलकी नअसल्यामुळे ते कोणाबरोबर जातात आणि कोणाचं सरकार बनवतात हे त्यावेळीच ठरू शकते मात्र अपक्षांच महत्त्व या निवडणुकीत आपल्याला नाकारून चालणार नाही.

**प्रस्तावना:**

20 नोव्हेंबर 2024 रोजी महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका पार पडलेले आहेत .राज्यात आचारसंहिता कार्यान्वित झालेली होती. महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीचा निकाल 23 नोव्हेंबर 2024 रोजी झालेला आहे. राज्यातील एकूण 288 जागा पैकी ही प्रक्रिया चालणार आहे महाराष्ट्राच्या राजकीय जलंगडणीत या निवडणुकीचे विशेष स्थान आहे 22 ऑक्टोबर रोजी निवडणूक अधिसूचना जाहीर झाली होती. त्यानंतर 29 ऑक्टोबर पर्यंत उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख होती यानंतर 30 ऑक्टोबर रोजी अर्जाची छाननी होईल. 4 नोव्हेंबर पर्यंत उमेदवारांना अर्ज मागे घेण्यास संधी होती. निवडणुकीच्या प्रक्रियेत महत्त्वाचे म्हणजे 25 नोव्हेंबर रोजी सर्व निवडणूक प्रक्रिया पार पडलेले होती 26 नोव्हेंबर रोजी विधानसभेचा कार्यकाळ संपुष्टात येणार आहे राज्यात एकूण 36 जिल्हे असून 288 जागांपैकी 234 जागा सर्वसाधारण उमेदवारांसाठी आहेत अनुसूचित जमातीसाठी 25 आणि अनुसूचित जातीसाठी 29 जागा राखीव आहेत राज्यातील मतदारांची संख्या 9 कोटी 63 लाख असून त्यामध्ये 4 कोटी 97 लाख पुरुष तर 4 कोटी 66 लाख महिला मतदारांचा समावेश आहे.यामुळे निवडणुकीतील विविध आणि लोकशाहीतील सहभागाची महत्त्वाचे मिळते यंदाच्या निवडणुकीत 1 लाख 186 मतदान केंद्रे उभारण्यात येणार आहेत ज्या शहरी भागातील 42 हजार 604 आणि ग्रामीण भागातील 57,582 केंद्रे असतील विशेष म्हणजे 530 मॉडेल मतदान केंद्र योजना निवडणूक आयोगाने जाहीर केले आहे. ज्यामुळे मतदारांना अधिक सुव्यवस्थित आणि आरामदाय मतदान करता येईल ,यावेळी 18 लाख 67 हजार मतदार पहिल्यांदाच मतदान करणार आहेत तसेच सहा लाख 2000 दिव्यांग मतदार तर बारा लाख पाच हजार ज्येष्ठ नागरिक आपला मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध राजकीय पक्षांनी आपले तंत्र आणि धोरण ठरवली आहेत. या प्रस्थापित पक्षाबरोबरच नवीन पक्षांचा समावेश आहे त्यामुळे राज्यातील राजकीय समीकरणे आणि मतदारांची भावना यावर मोठा परिणाम होऊ शकतो यामुळे आगामी निवडणुकांमध्ये मतदारांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे आवश्यक आहे लोकशाहीत मतदान हे एक मूलभूत अधिकार आहे याचा उपयोग प्रत्येक मतदाराने करणे अपेक्षित आहे या निवडणुका केवळ राजकारणाचा खेळ नसून राज्यांच्या भविष्याचा निर्धार करणारा एक महत्त्वाचा टप्पा आहे महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका महाराष्ट्राच्या जडणघडणीसाठी आणि राज्य विश्वास पात्र हातात देण्याच्या महत्त्वाची संधी आहे ज्यामुळे राज्यांची दिशा ठरवली जाईल सर्व मतदारांनी विशेष तरुण आणि सक्रियपणे मतदान प्रक्रियेत भाग घेणे हे सुचित करणे आवश्यक आहे की आपल्या मतांची शक्ती योग्य प्रकारे वापरली जाईल महाराष्ट्र एक व्यापक सांस्कृतिक विविधता आणि ऐतिहासिक परंपरा असलेला राज्य आहे तेथील येथील जनतेचा स्वभाव आणि मतदार वर्तन हे अत्यंत समजूतदारपणाचे आहे महाराष्ट्रातील जनतेची आकांक्षा

आणि त्यांच्या अपेक्षा त्यांचा दृष्टिकोनातून पाहता राजकीय पक्षांनी काही महत्त्वाच्या बाबीवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. महाराष्ट्रातील जनतेचा स्वभाव शिस्तप्रिय मिळतील विचारशीलता असा आहे विविध आणि सर्व समावेशता विश्वास असलेल्या या समाजात शिक्षणाच्या महत्त्वाची बाब आहे राजकारणाबाबत जनतेची अस्वस्थता आणि चिंता देखील स्पष्ट आहेत .विकास ,रोजगार, महिला सशक्तिकरण आणि शेतकऱ्यांचे कल्याण यासारख्या मुद्द्यावर जनतेचा भर आहे महाराष्ट्रातील मतदारांचे वर्तन परिपक्क आणि विकसित आहे लोकांच्या राजकारणात सक्रिय भाग वाढत आहे. विशेषता तरुण मतदारांचे सक्रियतेचे राजकारणात एक नवीन चैतन्य निर्माण झालेले आहे. आचारसंहितेचा आदर पारदर्शकता आणि सत्यता या बाबीचे ज्ञानही त्यांना प्रचंड आहे .अशा परिस्थितीत पक्षांमधील व्यक्तिगत कलह वादविवाह आरोप प्रत्यारोप यामुळे मतदारांचे विश्वास लोकशाही वरील कमी होत चाललेला आहे. राजकीय पक्ष आणि सामाजिक समर्पणाचे दर्शन घडवणे आवश्यक आहे शेतकऱ्यांचे प्रश्न कामगारांचे हक्क महिला सशक्तीकरण यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. पक्षाने त्यांच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता ठेवली पाहिजे मतदारांना त्यांच्या निर्णयाबाबत माहिती दिली पाहिजे. ज्यामुळे विश्वास निर्माण होईल डिजिटल प्लॅटफॉर्मर्स प्लॅटफॉर्म वापर करत असताना युवा मतदार पर्यंत पक्षाने आपला जाहीरनामा स्पष्टपणे पोहोचवणे गरजेचे आहे. समाज माध्यमाचा उपयोग करून प्रत्येक पक्षांना विचारविनिमय साधावा लागणार आहे .विविध समुदायांना व त्यांच्या समस्या समजून घेणे आणि त्यांच्याशी सुसंवाद साधणे आवश्यक त्यामुळे स्थानिक मुद्दे आणि चिंतेला प्राधान्य देणे शक्य होईल .नवीन विचार तंत्रज्ञान उपाययोजना स्वीकारण्याची तयारी असणं अत्यंत गरजेचे आहे .महाराष्ट्रातील मतदारांचे वर्तन आणि जनतेचा स्वभाव हे समजून घेतल्यास राजकीय पक्षाने त्यांची ध्येय धोरणे अधिक प्रभावीपणे बनवणे गरजेचे आहे. लोकशाहीमध्ये जनतेचा सहभाग हा अत्यंत महत्त्वाचा असतो आणि त्यांना हवे असलेले परिवर्तन साध्य करण्यासाठी पक्षाने योग्य दिशेने काम करणे आवश्यक आहे .त्यामुळे एक अधिक सक्षम आणि समृद्ध महाराष्ट्र निर्माण होईल याकडे या निवडणुकीच्या माध्यमातून सर्व पक्षाने कटाक्षाने लक्ष देणे गरजेचे आहे. महाराष्ट्र हा समृद्ध असणार राज्य आहे या राज्यामध्ये योग्य सरकार आल्यास महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास होण्यास कोणीही रोखू शकणार नाही .सर्व क्षेत्रांमध्ये समान संधीची उपलब्ध करून देत असताना राज्य सरकारने महाराष्ट्र राज्याचा समतोलित विकास करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर राज्यांमध्ये शेतीचे प्रश्न शेतीला असणाऱ्या पूरक प्रश्न रोजगारांचे प्रश्न उद्योगधंद्याचे प्रश्न कामगारांचे प्रश्न महिला सशक्तिकरण आरोग्याचे समस्या आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे महाराष्ट्र राज्याचे राजकीय पोषक वातावरण कसं स्थिर राहील याकडे सर्व राजकीय पक्षांनी लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे दर पंचवार्षिक मध्ये निवडणुका होत असतात परंतु महाराष्ट्र राज्यामध्ये काही प्रश्न कायमस्वरूपी प्रलंबित आहेत याकडे सध्याच्या राजकीय पक्षाने कटाक्षाने लक्ष देणे गरजेचे आहे. तसेच ज्या पक्षाला स्पष्ट बहुमत मिळेल त्यांनी राज्यांमध्ये समतोल विकास करण्याच्या दृष्टिकोनातून विचार करणं आवश्यक आहे आणि शाश्वत विकास करणे .महाराष्ट्र आणि झारखंड राज्यातील विधानसभेची निवडणूक अंतिम टप्प्यात आली आहे. निवडणुकीचा प्रचार सर्वच राजकीय पक्ष जोरदार करत आहे. मतांची जुळवणी आणि वजाबाकी करण्यात सर्वच राजकीय पक्ष गुंतले आहेत. त्यामुळे युत्या - आघाड्यांकडून मतदारांना आकर्षित करणाऱ्या घोषणांचा पाऊस पडायला लागलेला आहे. सर्वच राजकीय पक्ष समाजातील वेगवेगळे घटक आपल्याकडे कसे आकर्षित होतील या दृष्टीने प्रयत्न करू लागले.महाविकास आघाडी आणि महायुती यांनी महिलामता वर जास्तच लक्ष केंद्रित केले आहे. कोणी महिलांच्या मानधनातील रक्कम वाढवण्याची घोषणा करीत आहे. तर काही मानधनातचे यश घेण्याचा प्रयत्न करीत आहे. पुढच्या आठवड्यात हा प्रचार अधिक तीव्र होईल पण हे सगळं चालू असताना सर्वच पक्षांच्या उमेदवारांच्या डोकेदुखी झालेली आहे ती बंडखोर उमेदवार आणि अपक्ष उमेदवारामुळे . महायुती आणि महाआघाडी जरी आपापल्या बंडखोरांना काही प्रमाणात रोखण्यात जरी यशस्वी झाली असली तरीसुद्धा काही महत्त्वाच्या मतदारसंघांमध्ये बंडखोर,अपक्ष यांनी रंगत वाढलेली आहे.या निवडणुकीमध्ये बंडखोर आणि अपक्ष नी आपले महत्त्व वाढवले आहे. भारताच्या राज्यघटनेने संसदीय शासन पद्धतीचा स्विकार केला आहे. ही संसदीय शासन पद्धती जगात इंग्लंड मध्ये उदयाला आली .१९ व्या शतकात इंग्लंडचा प्रभाव जगभरात असल्याने की जगभरात पसरली. आपल्या देशात दीर्घकाळ ब्रिटिश राजवट असल्याने या राजवटीचाही प्रभाव आपल्यावर राहिला. संसदीय शासन पद्धती यशस्वी होण्यासाठी राजकीय पक्षांची आवश्यकता असते. राजकीय पक्ष सत्ता देतात,सत्तेवर नियंत्रण ठेवतात. लोकांचे प्रश्न सोडवतात. त्यातूनच लोकशाही चा उत्तर उत्तर विकास होतो. अर्थात यातील राजकीय पक्ष लोकशाही कडे कसे बघतात यावर बरेचसे अवलंबून आहे .

इंग्लंडमध्ये द्विपक्ष पद्धत आढळते तर भारतामध्ये बहुपक्ष पद्धत आहे.विशेष:१९७० नंतर प्रादेशिक अस्मितांचा उदय झाल्यानंतर देशभरातल्या वेगवेगळया राज्यांमधून प्रादेशिक पक्ष उदयाला आले. पुढच्या टप्प्यात ते सत्तेत सहभागी झाले. त्यामुळे जेव्हा निवडणुका येतात तेव्हा राजकीय पक्ष यांचे महत्त्व आपोआप वाढते. हे सांगायला कोणा तज्ञाची गरज नाही

सुरुवातीला जरी भारतात बहुपक्ष पद्धत असली तरी सुद्धा एक प्रबळ पक्षाचे प्राबल्य दीर्घकाळ राहिलेले दिसते. महाराष्ट्रात १९७८ सालापर्यंत काँग्रेस हाच सर्वात मोठा पक्ष होता. पण १९९०च्या नंतर हे स्वरूप बदलायला लागले. आता मोठ्या राष्ट्रीय पक्षांबरोबर राज्यातले

प्रादेशिक पक्ष तर आहेत पण मोठ्या प्रमाणात अपक्षांची संख्या वाढली आहे. अपक्षांची संख्या का वाढली हे थोडं समजून घेतलं पाहिजे. एक तर सत्ता, पैसा, प्रसिद्धी हे आपल्या राजकीय व्यवस्थेचं एक प्रमुख वैशिष्ट्य बनले आहे. सत्तेत स्पर्धा झाल्याने राजकीय पक्ष सर्वांनाच सत्ता देऊ शकत नाही हे स्पष्ट झाल्यानंतर आपलं उपद्रव मूल्य क्षमता वाढवणे, आपल्या स्पर्धकांची व्होट बँक फोडणे, हलवणे, एखाद्या मतदारसंघात एखादा मोठा जात समाज असेल तर त्या जात समूहात फूट पाडण्यासाठी अपक्षांची मदत होऊ लागली किंवा अगदी अलीकडच्या काळात उमेदवाराच्या नावाशी साधर्म्य असलेले अपक्ष म्हणून निवडणुकीच्या रिंगणात दिसू लागले आहे तासगाव कवठे महाकाळ मध्ये रोहित पाटील नावाचे चार उमेदवार दिसतात.हे एक उदाहरण आहे तुम्हाला महाराष्ट्राच्या असंख्य मतदारसंघात अशी उदाहरणे पाहायला अशी मिळतील. १९६२ सालच्या पहिल्या विधानसभेच्या निवडणुकीपासून आत्तापर्यंत १३ विधानसभेच्या निवडणुका झाल्या. त्यात एकूण २४५ अपक्ष आमदार निवडून गेले आहेत. लोकसभेचे मतदार संघ मोठे असल्याने लोकसभेत अपक्षांचा प्रमाण तुलनेत फार कमी दिसते.२०१४ च्या विधानसभेच्या निवडणुकीत १७०० अपक्ष उमेदवार उभे होते. अशीच संख्या थोड्याफार सरकारने २०१९ साली होती . १९९५ साली ४५ अपक्ष आमदार निवडून आले .आत्तापर्यंत हा सगळ्यात मोठा आकडा आहे. राज्यातील खऱ्या अर्थाने पहिले बिगर काँग्रेस भारतीय जनता पक्ष-शिवसेनाचे सरकार अपक्षांच्या मदतीने सत्तेत आले. यापूर्वी एवढ्या मोठ्या प्रमाणात अपक्ष कधीच निवडून गेले नव्हते. त्या मुळेच महाराष्ट्राच्या राजकारणात अपक्षांचे महत्व वाढत गेले. अपक्ष आमदार हे पुढं राज्याची सत्ता समतोलकाच्या भूमिकेत पाहायला मिळू लागले कारण १४५ प्लस ही आमदारांची मॅजिक फिगर पुढच्या टप्प्यात कोणताच एका राजकीय पक्ष स्वबळावर पूर्ण करू शकत नसल्यामुळे अपक्ष म्हणून निवडून घ्यायचं आणि नंतर आपलं बार्गेनिंग पॉलिटिक्स करायच असा नवा ट्रेण्ड राजकारणात दिसू लागला. त्यात काही अपक्ष आमदारांना कॅबिनेट , राज्य मंत्री पदही मिळाले. काही अपक्ष आमदार पुढच्या काळात राजकीय पक्षात गेल्याचे दिसून येते तर काही अपक्ष आमदार कुठल्याही राजकीय पक्षात न जाता अपक्ष म्हणूनच राजकारणावर छाप टाकण्याचा प्रयत्न करत राहिले. पण ते फारसे यशस्वी झाल्याचे दिसत नाही. अपक्ष आमदारांना कोणतीही विचारसरणी असतेच असं नाही. ते बऱ्याच वेळा बुड नसलेल्या भांड्यासारखा असतं. विधान परिषदेच्या निवडणुकीमध्ये अपक्षांचा आमदारांचा घोडेबाजार मोठ्या प्रमाणात होतो. २०१४च्या विधानसभेच्या निवडणुकीत अपक्ष आमदारांची संख्या कमी झाली. त्याचे मुख्य कारण मोदी लाट ही होती.

२०२४ साली अपक्षांच्या राजकारण काय असेल हे पाहणं आवश्यक आहे. बहुतेक सर्वच विधानसभेच्या मतदारसंघात अपक्ष उमेदवार आहे. २०२४ ची विधानसभा निवडणूक भारतीय जनता पक्ष ,काँग्रेस ,राष्ट्रवादी शरद पवार राष्ट्रवादी अजित पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे ,शिवसेना एकनाथ शिंदे अशा प्रमुख सहा पक्षात तर वंचित बहुजन आघाडी , महाराष्ट्र नवनिर्माण सेना,एमआयएम ,शेतकरी कामगार पक्ष ,डावे पक्ष, या खेरीज राष्ट्रीय समाज पक्ष, संभाजी राजे यांचा स्वराज्य पक्ष.. विनय कोरे यांचा जनसूराज्य पक्ष, इत्यादीअशा छोट्या छोट्या पक्षा बरोबरच अपक्ष यांच्यात ही निवडणूक लढली जात आहे. महाविकास आघाडी महायुती

**संदर्भ-**

1. दैनिक सकाळ
2. दैनिक लोकसत्ता
3. दैनिक दिव्य मराठी
4. मासिक लोकराज्य
5. भारतीय निवडणूक आयोग वेबसाईट